**सरकारतर्फे साक्षदार क्रमांक ४ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

नाव – श्रीकृष्ण घनश्याम उके

वय – ५२ वर्ष, व्यवसाय – टेलरिंग काम

राहणार – राय नगर, कन्हान, ता.पारशिवणी, जिल्हा नागपूर

**<u>सरतपास शपथेवर सरकारतर्फे सरकारी अभियोक्ता एस.व्ही. रामटेके यांच्यातर्फे</u>**

१. घटना दिनांक ११/०९/२०२२ रोजी संध्याकाळी ७.०० ते ७.३० वाजताच्या दरम्यान तारसा रोड चौकात घडली होती. त्यावेळी मी, माझा मुलगा सागर, माझा भाऊ भुमीराज, त्याची पत्नी व मुलगा असे मारोती किराणा स्टोर्स समोर उभे होतो. माझा भाऊ भुमीराज त्याच्या पत्नी व मुलासोबत घरी जाण्याकरीता स्कुटरने निघाला. परंतु ट्राफिक असल्यामुळे तो थांबला. त्यावेळी कामठी कडून हुड नावाचा मुलगा मोटरसायकलने आला व माझ्या भावाच्या गाडीला धडक मारली. त्या मोटरसायकल चा क्रमांक ६९२७ असा होता. धडक मारल्यानंतर आम्ही धावत माझ्या भावाच्या दिशेने पळाला व मी व एक मुलगा शुभम सायरे असे मिळून माझ्या भावाला साईडला केले. त्यावेळी माझ्या भावाला काही समजत नव्हते व तो अर्ध बेशुध्द अवस्थेत होता. मी माझ्या भावाच्या पायाला उचलण्याचा प्रयत्न केला असता तो जोराने ओरडला. मोटरसायकल चालकाला तेथे जमलेल्या लोकांनी पकडलेले होते व तो दारु पिलेला होता. त्यानंतर मी एक ऑटो बोलाविला व माझ्या भावाला आशा हॉस्पीटल येथे नेले. तेथे डॉक्टरांनी माझ्या भावाचा पाय फ्रॅक्चर झाल्याचे सांगितले. पोलीसांनी माझे बयान घेतले होते.

**सरतपास पूर्ण**

**<u>उलटतपास आरोपी तर्फे वकील रिना गणवीर यांच्यातर्फे.</u>**

२. पोलीसांना बयान देतांना ' त्यावेळी मी, माझा मुलगा सागर, माझा भाऊ भुमीराज, त्याची पत्नी व मुलगा असे मारोती किराणा स्टोर्स समोर उभे होतो. माझा भाऊ भुमीराज त्याच्या पत्नी व मुलासोबत घरी जाण्याकरीता स्कुटरने निघाला. परंतु ट्राफिक

असल्यामुळे तो थांबला. त्यावेळी कामठी कडून हुड नावाचा मुलगा मोटरसायकलने आला व माझ्या भावाच्या गाडीला धडक मारली,त्यावेळी माझ्या भावाला काही समजत नव्हते व तो अर्ध बेशुध्द अवस्थेत होता. मी माझ्या भावाच्या पायाला उचलण्याचा प्रयत्न केला असता तो जोराने ओरडला. मोटरसायकल चालक त्यावेळी दारु पिलेला होता, मी व एक मुलगा शुभम सायरे असे मिळून माझ्या भावाला साईडला केले' याबाबी सांगितल्या होत्या परंतु सदर बाबी माझ्या बयानात नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. पोलीसांनी माझे बयान कधी घेतले याची तारीख माझ्या लक्षात नाही. तसेच माझ्या भावाने घटनेबाबत कधी फिर्याद दिली हे माझ्या लक्षात नाही. हे म्हणणे खरे नाही की घटनेच्या वेळी माझा भाऊ गाडी चालवित होता. हे म्हणणे खरे आहे की त्यावेळी माझ्या भावाच्या गाडीवर तिघे जण होते. हे म्हणणे खरे नाही की माझ्या गाडीवर तिघे जण असल्यामुळे रोड क्रॉस करत असतांना माझ्या भावाचा तोल गेला व त्यामुळे तो खाली पडला. हे म्हणणे खरे नाही की उपरोक्त मोटरसायकल ने माझ्या भावाच्या गाडीला धडक मारल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत/समक्ष

Digitally signed by RAJESH RAMESHRAO SHEREKAR
Date: 2024.07.05 16:15:15 +0530

ठिकाण –कामठी

**(रा.र. शेरेकर)**

दिनांक –०५/०७/२०२४

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्या. क्र. ३, कामठी.